'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, January-2024, Volume-16 Issue-1

# भारतीय स्वांतत्र्यलढ्यातील उपेक्षित विरंगणा : राणी झलकारी

**Dr. Kunda Balasaheb Kavade**
Department of Marathi, Arts Commerce and Science College Alkuti Tal. Parner. Dist. Ahmednagar
**Corresponding Author- Dr. Kunda Balasaheb Kavade**
**Email:** kavadekunda@gmail.com

**प्रस्तावना:**

ज्या -ज्यावेळी भारतावर परकीय अक्रमणे झाली त्या-त्यावेळी आदिवासी जमातीनी त्यांना अत्यंत प्रखरपणे विरोध केला. आदिवासी स्त्री पुरुषांचे योगदान खुप मोठे आहे. भारतीय स्वांतत्र्यलढयात आदिवासीचा सुवर्णअक्षरानी लिहून ठेवावा असा गौरवशाली इतिहास आहे. आदिवासी क्रांतीकारकांचा उपेक्षित इतिहास समाजासमोर मांडण्याचे कार्य आदिवासी लेखकांनी केले आहे. मराठी वाङ्मयात आदिवासी साहित्याने मोलाचे असे स्थान निर्माण केलेले आहे. भारतीय स्वांतत्र्यलढयात अनेक वीर पुरुष, वीर स्त्रिया, क्रांतिकारक पुरुष, संत आणि आदिवासी समाज बांधवांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान हे समाजबांधवांसाठी महत्वाचे आहे. इस्लामच्या आक्रमणाविरुद्ध लढताना राणी दुर्गावतीपासून ते पुंजा भिल्लापर्यंत अनेक आदिवासी शूरवीरांनी आपल्या प्राणाचे बलिदानही दिले. आदिवासींनी जे संघर्ष केले, त्या संघर्षामध्ये आदिवासी वीरांनी या संघर्षात आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. शुरवीर आदिवासीच्या रक्ताने लिहिलेल्या या इतिहासाची तेजस्वी पाने मात्र भारतीय इतिहासात उपेक्षित राहिली. आदिवासी स्त्रियांनीही रणभूमीवर आपले कर्तृत्व गाजवले आहे. अशीच एक आदिवासी उपेक्षित विरंगणा राणी झलकारीचे उपेक्षित व्यक्तिमत्व या लेखात मांडले आहे.

लेखक मारोती उईके यांनी 'इतिहासात गाडलेले आदिवासी क्रांतिकारक' या पुस्तकात झलकारीबाईची व्यक्तिरेखा चित्रित केली आहे. २२ नोव्हेंबर १८३० रोजी वीरांगना झलकारीचा जन्म झाला. आदिवासी कोरी समाजात जन्म झालेल्या या वीरांगनेने १८५७ चे रण गाजविले. झांसीजवळ बालाजी मार्गावर असलेल्या भोजला हे तिचे जन्मगाव होय. मूलचंद नावाच्या सर्वसाधारण कष्टकऱ्याची झलकारी ही एकुलती एक मुलगी. झलकारी ही उठावदार बांध्याची, घारे डोळे, सरळ नाक आणि करारी व्यक्तिमत्त्वाची. बालपणापासूनच धाडसी वृत्तीची ! देशरक्षणासाठी सैनिक होण्याचे तिचे स्वप्न होते. १८५७ च्या युद्धात राष्ट्रीय भावनेने प्रेरित होऊन ज्या झलकारीने आपल्या प्राणाची आहुती दिली. ती आदिवासी कोरी समाजातील झलकारी मात्र ऐतिहासिकदृष्ट्या उपेक्षित राहिली. जे रणमर्द रणात मेले, ज्या रणमर्दिन्यांनी रणात प्राणाच्या आहुत्या दिल्या त्यांचा इतिहास जाणीवपूर्ण काळया कभिन्न कोठडीत कोंबून ठेवला. इंग्रजांनी देशात शिक्षणप्रसार केला आणि बहुजन समाजात इतिहास संशोधक निर्माण झाले. त्याचाच परिपाक म्हणून झलकारीने इतिहासात पुनर्जन्म घेतला.

झलकारी बारा वर्षाची असतानाच कुऱ्हाड घेऊन इंधन गोळा करण्यासाठी जंगलात गेली. इंधन जमा करत असताना एक चित्ता आक्रमकरीत्या तिच्या दिशेने धावून आला. झलकारीने न घाबरता, तेवढ्याच आक्रमकतेने त्या चित्त्यावर कुऱ्हाडीं सपासप वार केले. वार करताना तिच्या हातून कुऱ्हाड निसटली तरीही न घाबरता झलकारीने त्या चित्त्याशी मल्लयुद्ध केले. त्या चित्त्याला जबड्यातून फाडत नेले. चित्त्याचा तेथेच अंत झाला. जेव्हा झलकारी घरी परतली तेव्हा तिचे आईवडिल तिला बघून घाबरले, तेव्हा झलकारीने झालेल्या घटनेची इत्यंभूत माहिती दिली. झलकारीच्या साहसाची कथा सर्वत्र पसरली. झासी शहरात राहणारा पुरन कोरी या सैनिकास झलकारीची साहसी कथा पटली. त्यामुळे तिला पाहणे व तिच्याविषयीची अधिक माहिती जाणून घेण्याची जिज्ञासा पुरनच्या मनात जागली. तो झासी संस्थानात शिपाई असल्याने मल्लखांब, कुस्ती, बंदूक चालविणे, दांडपट्टा, तलवार चालविणे इ. गोषीत प्रवीण होता. परण कोरीने वलकारीच्या मामाची कथा त्याच्या आईला ,ऐकविली. आजूबाजूच्या खेड्यातील लोकांच्या मध्यस्थीने झलकारीशी विवाह करण्याची इच्छा प्रकट केली. झलकारीच्या आई-वडिलांनी राजीखुशीने या विवाहास मान्यता दिली.

विवाहानंतर गृहिणीसारखे जीवन जगण्यापेक्षा, मातृभूमीसाठी काहीतरी करून मरावे अशी तिची मनोमन इच्छा होती. त्यामुळे पतीच्या सहकायनि युद्धकलेत अधिकाधिक प्रगल्भ होऊन झासी सैन्यात भरती होण्याची इच्छा तिने सासरकडील मंडळींना बोलून दाखविली. सुनेवर पराकोटीचा गर्व असलेल्या सासऱ्यांनी तिला चुटकीसरशी परवानगी दिली. तिचे पती पुरन कोरी हे उत्कृष्ट योद्धा असल्याने सर्वप्रथम त्यांनाच आपला गुरू मानून तिने युद्धकला हस्तगत केली. उरला प्रश्न झासी

सैन्यातील प्रवेशाचा. सन १८४३ ला गंगाधर राव यांना झासी संस्थान मिळाले. राणी लक्ष्मीचे पोटी पुत्र होत नसल्याने गंगाधररावांनी दामोदरराव यास दत्तक घेतले. लगेचच गंगाधररावांचा मृत्यू झाला. गंगाधररावांच्या मृत्यूने झासीचे संस्थान लक्ष्मीबाईने हाती घेतले. संस्थान एका बाईच्या हाती आल्याने इंग्रजांनी हळूहळू पाय पसरविणे सुरू केले. सन १८५३ मध्ये गंगाधररावांचा झालेला अकस्मात मृत्यू म्हणजे इंग्रजांना पर्वणीच ठरून गेला. त्यांनी दामोदररावांचे दत्तक विधान नामंजूर ठरवून झासी खाली करण्याच्या हालचाली सुरू केल्या. १८५४ मध्ये भारतात गव्हर्नर जनरल म्हणून आलेल्या लॉर्ड डलहौसीने एका पाठोपाठ एक अशी संस्थाने खालसा करायला सुरुवात केली. मेरठ, नागपूर. ग्वाल्हेर, कानपूर, हैद्राबाद अशी एकामागून एक संस्थाने लॉर्ड डलहौसीने खालसा केली. एलीस आणि माल्कम या इंग्रज अधिकाऱ्यांनी ही संस्थाने खालसा करण्यात महत्त्वाचा हातभार लावला. राणी लक्ष्मीचे राज्य कायदेशीरदृष्ट्या अस्ताला गेले. हातचे राज्य गेल्याने राणी पुरती नाराज झाली. झासीचा कारभार तूर्तास तिच्याच हाती असल्याने स्वतःच्या रक्षणासाठी तिने महिला सैन्य उभे करण्यास इंग्रजांची परवानगी घेतली. बारीशन, मोतीबाई, जूही, सुंदर, मुदरी, काशिबाई आणि झलकारी यांच्या नेतृत्वात फौजफाटा उभा केला. १० मे १८५७ ला मेरठ छावणीत युद्धाची ठिणगी पडली. राणी लक्ष्मीबाईंचा सल्लागार याने युद्धात भाग घेण्याचा सल्ला दिला. ६ जून १८५७ ला राणी लक्ष्मीने युद्धात अप्रत्यक्षपणे उतरण्याचा निर्णय घेतला. मात्र मेजर ह्यूसनचा राणीवर विश्वासच नव्हता. त्याने झासी काबीज करून विद्रोह दडपण्याचा प्रयत्न केला. १

झलकारी ही राणीची खास रक्षक होती. त्याचप्रमाणे तिची काया शरीरयष्टी हुबेहुब राणी लक्ष्मीसारखीच होती. झलकारी साक्षात राणी लक्ष्मीबाई वाटत असल्याने राणीचा सल्लागार नाना भोपटकर याने छुप्या मार्गाने राणीला पळून जाण्याचा सल्ला दिला. राणीने तो कृतीत उतरवून आपल्या जागी झलकारीला उभे केले आणि राणी छुप्या मागनि पळाली. राणी पळताच स्वतःच झलकारीने राणी लक्ष्मीबाई म्हणून घोषित करून इंग्रजांचा संहार करण्यास प्रत्यक्ष युद्धात उतरली. इंग्रजांना थोपवून धरण्याचे महत्त्वपूर्ण काम झलकारीने केले. इंग्रजांशी लढताना झलकारीचे पती शहीद झाले. ही दुःखद बातमी झलकारीच्या कानावर पडली, परंतु भावविवश न होता एखाद्या घायाळ सिंहिणीसारखी इंग्रजांवर तुटून पडली. अचानक एक सनसनाटी गोळी झलकारीच्या छातीत घुसली. झलकारी घायाळ होऊन लढतच राहिली. एका मागून एक अशा अनेक गोळया तिच्या शरीरात सोडल्या. ४ जून १८५८ ला झलकारीला एखाद्या सिंहासारखे वीरमरण आले, परंतु मेजर ह्यूसन तिला राणी लक्ष्मीबाईच समजत होता. झलकारीची बहादुरी आणि निर्भयता बघून मेजर ह्यूसन म्हणाला, "अर्थात भारतातल्या फक्त १% मुली जरी भारतीय स्वातंत्र्यासाठी दिवाण्या झाल्या असत्या, तर इंग्रजांना केव्हाच भारत सोडून जावे लागले असते.२

१८५७ च्या राष्ट्रीय भावनेतून लढणारी वीरांगना झलकारी देवी ही एकमेवच असावी. झलकारीच्या रणमर्दानीचा फायदा उठवून तिचा इतिहास राणी लक्ष्मीच्या नावे नोंदला गेला. भा. मा. देशमुख यांनी असे म्हटले आहे की, "राणी तटावरून घोडा उडविणे तर दूरच, पण तिला घोड्यावर बसविण्यासाठीही साथीदार मदत करीत होते. झासीवालीच्या चारित्र्याबद्दलचे पुरावे भटांनी नष्ट केले असले, तरी तिचे चारित्र्य अनेकांना संशयास्पद वाटते. म्हणून जाणकार मराठा आपल्या कर्तबगार मुलीला 'मर्दानी झासीवाली' म्हणू देत नाही. “3

अशा प्रकारे वीरांगना झलकारीचा इतिहास जाणीवपूर्वक लपवून तेथे लक्ष्मीबाईचा इतिहास पुढे आणला. ज्या ठिकाणी झलकारी लढली, लढता लढता वीरगती प्राप्त झाली तेथे ब्राह्मणांनी आदिवासी स्त्रिला लपवून ठेवून तिच्या नावावरचा इतिहास लक्ष्मीबाईच्या नावे लिहिला.

**संदर्भग्रंथ सूची**

१) ‘ इतिहासात गाडलेले आदिवासी क्रांतीकारक ' उईके मारोती, उलगुलान प्रकाशन, वर्धा, प्रथमावृत्ती मे २०११.पृष्ट क्र.५
२) तत्रैव पृ. क्र. ६-१२
३) तत्रैव पृ. क्र. ७
४) ‘आदिवासी वीरपुरुष’ गारे (डॉ) गोविंद श्रीविद्या प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती 1986. महाराष्ट्रीतील आदिवासी मराठी साहित्य : एक शोध ' , गावित (डॉ) माहेश्वरी.